# *कधी आणि कसा होणार दुष्काळमुक्त मराठवाडा* ?

.

***मुक्तीचा अमृत काळ संपला***

***विकासाचा अनुशेष बाकी***

मुख्यमंत्री मराठवाड्यात आले की सातत्याने सांगत आहेत मराठवाड्यातील पुढची पिढी दुष्काळ पाहणार नाही. परंतु वास्तव वेगळे आहे. 15 ऑगस्ट 1947 रोजी भारत स्वातंत्र्य झाला आणि त्यानंतर 13 महिन्यांनी, 17 सप्टेंबर 1948 रोजी मराठवाडा निजामाच्या जोकडातून मुक्त झाला. पुढे संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीच्या प्रक्रियेत मराठवाडा महाराष्ट्रात सहभागी झाला. मराठवाड्याच्या सर्वांगीण विकासाचे स्वप्न उराशी बाळगून महाराष्ट्रात सहभागी झालेल्या या प्रदेशाचा विकासाचा अनुशेष मात्र आजही कायम आहे. शिक्षण, उद्योग, रोजगार ,शेती आणि सिंचन अशा अनेक क्षेत्रात मराठवाड्याला अपेक्षित न्याय मिळाला नाही. यातील सर्वात गंभीर आणि अग्रक्रमांचा प्रश्न म्हणजे सिंचनाचा अनुशेष .

***सततचा दुष्काळ: मराठवाड्यांचे न भरून निघणारे नुकसान***

दर दोन-तीन वर्षांनी ओला किंवा कोरडा दुष्काळ, ही परिस्थिती मराठवाड्याच्या वाटेला सातत्याने येत आहे. दुष्काळामुळे शेतीचे, पशुधनाचे, फळबागाचे आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेचे प्रचंड नुकसान झाले .सिंचना अभावी शेती परवडत नाही. परिणामी गरीबी, बेरोजगारी ,स्थलांतर आणि शेवटी शेतकरी आत्महत्या अशा दृष्टचक्रात मराठवाड्यातील ग्रामीण समाज अडकला आहे. एकाअर्थाने टँकरवाडा अशी ओळख निर्माण होते, ही मराठवाड्यासाठी अत्यंत वेदनादायक बाब आहे. पाण्याचा प्रश्न सुटल्याशिवाय मराठवाड्याचा शाश्वत विकास शक्य नाही .

***पाणी उपलब्धता- प्रादेशिक असमतोल***

महाराष्ट्रातील प्रदेशनिहाय पाणी उपलब्धता विचार केला तर क्षेत्रफळाच्या तुलनेत मराठवाड्याला मिळणाऱ्या पाण्याचे प्रमाण अत्यंत कमी आहे. मराठवाड्याचे क्षेत्रफळ महाराष्ट्राच्या सुमारे 27 टक्के असताना पाण्याचा वाटा केवळ सुमारे 8 टक्के असल्याचे विविध अभ्यासातून अधोरेखित झाले आहे . पश्चिम महाराष्ट्राचे क्षेत्र 46 टक्के तर पाणी74 टक्के व विदर्भाचे क्षेत्र 27 टक्के तर पाणी 18 टक्के आहे .साधारणपणे प्रति हेक्टर 3000 घनमीटर पाण्याची उपलब्धता आवश्यक आहे ,परंतु मराठवाड्यात फक्त 1688 घनमीटर प्रति हेक्टर एवढे आहे. हेच प्रमाण प्रति दरडोही भाषेत 1700 घनमीटर प्रति दरडोई अपेक्षित असताना मराठवाड्यात फक्त 438 दरडोई घनमीटर एवढे आहे .

मराठवाड्याचे सध्याचे सिंचन क्षेत्र केवळ सुमारे 20 टक्क्यांच्या आसपास आहे. बहुतांश शेती पावसावर अवलंबून आहे. सुमारे 70 टक्के भूभाग दुष्काळ प्रवण असून ,रंगनाथन समितीच्या

संदर्भानुसार 76 पैकी 53 तालुके अवर्षणप्रवण क्षेत्रात येतात. त्यात सुमारे 80 टक्के शेतकरी अल्पभूधारक व अल्पभूधारक आहेत. एकूण काय तर मराठवाडा हा तुटीचा, दुष्काळग्रस्त व विकासापासून वंचित असलेला प्रदेश आहे .

***आजतागायत झालेला जलसंपत्तीचा विकास* .**

महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर विविध आयोग, समिती आणि शासनाच्या जलविषयक धोरणांमधून मराठवाड्यात जलसाठे निर्माण करण्यात आले. आज मराठवाड्यात मोठे 11 माध्यम 75 लघु 749 ,गोदावरी, मांजरा- रेणावर 42 असे एकूण 877 प्रकल्प आहेत. या सर्व धरणांची एकत्रित साठवण क्षमता 332 टीएमसी एवढी आहे. यांच्या जोडीनेच मराठवाड्यातील पाणलोटासाठी उपलब्ध 50 लाख हेक्टर पैकी 29 लाख हेक्टर क्षेत्रावर एकात्मिक पाणलोट,जलसंधारणाची कामे करण्यात आलेली आहेत .

***समन्यायी पाणी वाटपंचा प्रश्न***

2019 राज्य एकात्मिक जल आराखड्यानुसार विभागनिहाय असमतोल उपलब्ध पाण्याचे समन्यायी तत्त्वानुसार वाटप होणे आवश्यक आहे. जायकवाडी उर्ध्वभागाकरिता 115 टीएमसी पाणी साठवण्यास परवानगी असताना अतिरिक्त 63 टीएमसी एवढ्या साठवण क्षमतेची छोटी, मोठी धरणे बांधून अनाधिकृतपणे पाणी अडवले आहे. याचा परिणाम जायकवाडीवर होतो. याबरोबरच समन्यायी तत्त्वानुसार प्रत्येकवर्षी ऑक्टोबर अखेर जायकवाडी धरणात 65 टक्के पेक्षा कमी पाणी असल्यास महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम 2005 कलम 12 (6) सी, मेंढेगिरी समिती अहवाल व मा उच्च न्यायालय मुंबई आदेश 2016 पीआयएल क्र 173 नुसार जायकवाडीत उर्ध्वभागातून: पाणी सोडणे अपेक्षित आहे. परंतु वेळोवेळी संघर्ष करावा लागतो. शिवाय मुकणे, वाकी ,भाव व भावली धरणातील पाणी शहापूर तालुका व उद्योगक्षेत्राकरिता आरक्षित करून नांदूर मधमेश्वर पाण्यावर टाकलेला दरोडा हा मराठवाड्यावर अन्यायकारक आहे .

***सिंचन अनुशेष सर्वात मोठे आव्हान***

महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्रधिकरण अधिनियमन 2005 च्या 2020 -21 च्या अहवालानुसार मराठवाड्यातील सिंचनाचा अनुशेष 6.17 लाख हेक्टर आहे. हे भरून काढण्यासाठी सद्यस्थितीत 40 हजार कोटी पेक्षा अधिकची आर्थिक तरतूद करण्याची आवश्यकता आहे. आज घडीला मराठवाड्याचे सिंचन क्षेत्र 20 टक्के . तर विदर्भाचे 30 टक्के तर पश्चिम महाराष्ट्राचे 40 टक्के पर्यंत पोहोचले आहे. चितळे आयोगाच्या अहवालानुसार मराठवाड्याला 260 टीएमसी पाण्याची आवश्यकता आहे .

***वितरण व्यवस्था व धरणातील गाळ - जटिल समस्या***

मराठवाड्यातील कालवे, वितरिका ,चारी यांची दयनीय अवस्था आहे. यामुळे धरणातील 40 टक्के पाणी वाया जाते. केंद्रीय जलआयोग 2024 व मेरीच्या आवालानुसार मराठवाड्यातील प्रमुख धरणात 15 टक्के गाळ साठलेला आहे. यामुळे धरणांची साठवण क्षमता कमी झालेली आहे. शिवाय 70 टक्के प्रशिक्षित मनुष्यबळांचा अभाव. टाटा सोशल सायन्स मुंबई संस्थेच्या 2021 च्या अहवालानुसार अकार्यक्षम वितरण व्यवस्था व महाराष्ट्र सिंचन पद्धतीचे शेतकऱ्याकडून व्यवस्थापन अधिनियम 2005 नुसार पाणी वापर संस्थेचे बळकटीकरण न करणे, व समन्यायाचा अभावामुळे अपेक्षित सिंचन क्षेत्र आजतागायत कधीही साध्य झालेले नाही .यामुळे धरणातील पाणी बांधापर्यंत पोहोचतच नाही. दैव देते पण फाटकी माझी झोळी अशी वितरण व्यवस्थेची अवस्था झालेली आहे.

***राजकीय उदासीनता***

मराठवाड्यात सातत्याने गंभीर होत चाललेल्या पाणी प्रश्नाला राजकीय उदासीनताही जबाबदार आहे. पश्चिम वाहीनी नद्यांचे मराठवाड्यांच्या हक्कांचे पाणी, समन्यायी पाणी वाटप, वर्षानुवर्ष अपूर्ण प्रकल्प- व वितरण व्यवस्था या मूलभूत प्रश्नांना राज्याच्या पातळीवर सातत्याने आणि एकमुखाने मांडणारी राजकीय ताकत अपेक्षेप्रमाणे प्रभावीपणे पुढे आलेली दिसत नाही. पक्षीय राजकारणाच्या पलीकडे जाऊन संपूर्ण मराठवाड्याच्या पाणी प्रश्नाला न्याय देणारे आणि मराठवाड्याच्या विकासाची दृष्टी असणारे राजकीय नेतृत्वाची आज मराठवाड्याला गरज आहे .

***उपाययोजना* :**

मुलताह मराठवाडा हा तुटींचा प्रदेश आहे. ज्या खोऱ्यात विपुल पाणी उपलब्ध आहे. ते समन्याची तत्त्वानुसार दुष्काळी मराठवाड्याकडे वळवणे काळाची गरज आहे .

***आंतरखोरे पाणी वहन***

***पश्चिम वाहिनी नद्यांचे पाणी***

महाराष्ट्र राज्य एकात्मिक जलआराखडा शासन निर्णय 23 ऑगस्ट 2019 व 19 सप्टेंबर 2023 नुसार पश्चिम वाहिनी नद्यांचे 168.75 टीएमसी पाणी नदी जोड प्रकल्पद्वारे मराठवाड्याकडे वळवणे अपेक्षित आहे. हा प्रकल्प लालफितीत अडकल्यामुळे आजतागायत एक थेंबही पाणी मिळू शकले नाही.

***कृष्णा मराठवाडा प्रकल्प*.**

कृष्णा मराठवाडा प्रकल्पांतर्गत मा .विलासरावजी देशमुख मुख्यमंत्री असताना 2005 साली 23 टीएमसी पाणी मराठवाड्याला मंजूर झाले होते. व कोल्हापूर सांगली चे पुराचे अतिरिक्त 30 टीएमसी पाणी मराठवाड्याला उजनीद्वारे मराठवाड्याला मिळावे हा 2024 चा निर्णय दोन्ही कागदावरचा असून, फक्त सात टीएमसी करिता प्रत्यक्षात काम चालू आहे .

***विदर्भातील अतिरिक्त पाणी*:-**

विदर्भात नैसर्गिक नियमानुसार 71 टीएमसी पाणी अतिरिक्त आहे .यातील 32 टीएमसी पाणी येलदरी व पैनगंगा धरणात वळवून हे पाणी दुष्काळी मराठवाड्यातील हिंगोली व नांदेड जिल्ह्यांना याचा फायदा होणार आहे .

***मिशन मोडवर एकात्मिक पाणलोट प्रकल्प* .**

वरील उपायोजना बरोबरच ज्या क्षेत्राला धरण लाभक्षेत्रांचा लाभ होणार नाही अशा वर्षानुवर्ष सिंचनापासून वंचित असलेल्या क्षेत्राला संरक्षित सिंचनाकरिता पाणी उपलब्ध करून देण्याकरिता मराठवाड्यात मिशन मोडवर मोठ्या प्रमाणात एकात्मिक पाणलोट क्षेत्र विकास प्रकल्प राबविण्याची अत्यंत आवश्यकता आहे. वरील सर्व उपयोजना प्रत्यक्षात उतरविण्यासाठी प्रचंड राजकीय इच्छाशक्तीची आवश्यकता आहे .अंतरखोरे पाणीवहन, समन्यायी पाणी वाटप, अपूर्ण धरणे, सुधारित आधुनिक वितरण व्यवस्था, पाणलोट द्वारे विकेंद्रीत जलव्यवस्थापन, उपलब्ध पाण्यानुसार पिक पद्धती , पाण्याचा कार्यक्षम वापर, या सर्व बाबींचा एकत्रित विचार व समन्वयाने कालबद्ध कार्यक्रम राबविल्यास दुष्काळ मुक्त मराठवाडा शक्य आहे .

***लोकचळवळ***

यापुढे मराठवाड्यातील जनतेची दुष्काळ सहन करण्याची सहनशीलता संपलेली आहे. पाण्याअभावी न परवडणारी शेती ,बेरोजगारी, हे मराठवाड्यातील मराठा आंदोलनाचे मूळ आहे .मराठवाड्याच्या न्याय हक्काच्या पाण्यासाठी समाजातील सर्व स्तरातील जनतेच्या सहभागाने सजग , प्रगल्भ, सामाजिक दृष्ट्या जबाबदार लोकाभिमुख ,लोकमान्य अशी लोक चळवळ उभी करण्याची आवश्यकता आहे. मुख्यमंत्र्यांनी पुढाकार घेऊन मराठवाड्याचा पाणी प्रश्न लवकर सोडावा अन्यथा मराठवाड्यात मराठा आंदोलनासारखे दुसरे जल जन आंदोलन उभे राहील व यास शासन जबाबदार राहील .

नरहरी शिवपुरे<br>
अध्यक्ष<br>
मराठवाडा पाणी परिषद